21-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/20/2025 11:11 PM Page 1



# बर्लिन ओपन : आर्यना सबालेन्काचे विजयी पुनरागमन

**बर्लिन, दि. २० :**

फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीतील पराभवाच्या केवळ १२ दिवसांनंतर, जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या आर्यना सबालेन्काने गुरुवारी बर्लिन ओपन स्पर्धेत विजयी पुनरागमन केले. दुसऱ्या फेरीतील सामन्यात बेलारूसच्या सबालेन्काने स्वित्झर्लंडच्या रेबेका मासारोवावर ६-२, ७-६ (८/६) अशी सरळ सेट्समध्ये मात केली.

बुधवारी पावसामुळे सामना पहिल्या सेटनंतर थांबवण्यात आला होता. पुनर्प्रारंभ झाल्यानंतर ११२व्या मानांकित मासारोवाने सबालेन्काला टायब्रेकमध्ये खेचून नेले, मात्र अखेरीस सबालेन्काने अनुभवाच्या बळावर सामना जिंकला. या विजयासह सबालेन्का बर्लिन ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली असून, १० दिवसांवर येऊन ठेपलेल्या विम्बल्डन स्पर्धेपूर्वी गवतावरचा आपला फॉर्म सुधारणे तिला शक्य झाले आहे.



२७ वर्षीय सबालेन्काने आतापर्यंत कारकिर्दीत २० जेतेपदे पटकावली आहेत, परंतु अद्याप गवतावरील एकही विजेतेपद तिच्या नावे नाही. बर्लिनमधील उपांत्य फेरीत स्थान निश्चित करण्यासाठी तिचा सामना आता कझाकस्तानच्या ११व्या मानांकित एलेना रायबाकिना किंवा चेक प्रजासत्ताकच्या दुहेरी तज्ज्ञ कॅटरिना सिनियाकोवाशी होणार आहे. दरम्यान, दिवसाच्या पहिल्या सामन्यात २०२३ ची विम्बल्डन विजेती आणि सध्या १६४व्या क्रमांकावर असलेल्या झेक प्रजासत्ताकच्या मार्केटा वोंड्रोसोवाने रशियाच्या १२व्या मानांकित डायना श्नाइडरचा ६-३, ६-७ (३/७), ६-३ असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. हा सामना दोन तास २० मिनिटे चालला.

आता वोंड्रोसोवाचा सामना ट्युनिशियाच्या ओन्स जाबेरशी होणार आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, वोंड्रोसोवानेच दोन वर्षांपूर्वी विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात जाबेरचा पराभव केला होता.






# भारतीय बुद्धिबळपटू दिव्या देशमुखची कमाल



**नवी दिल्ली, दि. १९ :**

लंडन येथे सुरू असलेल्या ऋखडऊए वर्ल्ड रॅपिड अँड ब्लिट्झ टीम चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने कमाल केली. दिव्याने पहिल्या क्रमांकाच्या होउ यिफानला हरवले. या कामगिरीसाठी पंतप्रधान मोदींनी दिव्याचे अभिनंदन केले. दिव्याने एक्स पोस्ट करत पंतप्रधान मोदींचे आभार मानले.

संयम आणि दृढनिश्चयाने दिव्याने होउ यिफानचा पराभव केला. या कामगिरीसाठी दिव्याचे अभिनंदन असे पंतप्रधान मोदींनी त्यांच्या शुभेच्छा संदेशात नमूद केले आहे. तर पंतप्रधानांकडून सन्मानित होणे खूप सन्मानाचे आणि प्रेरणादायी असल्याचे दिव्याने तिच्या एक्स पोस्टमध्ये नमूद केले आहे.

नागपूरच्या १९ वर्षीय दिव्याने रुक-व्हर्सेस-बिशपच्या तणावपूर्ण अंतिम सामन्यात ७४ चालींमध्ये विजय मिळवण्यासाठी तिची प्रबळ इच्छाशक्ती आणि रणनीतिक कौशल्य दाखवले. दिव्याची कामगिरी बुद्धिबळ जगतात चर्चेचा विषय झाली आहे.

दिव्याने हेक्सामाइंड बुद्धिबळ क्लबच्यावतीने खेळत वर्ल्ड रॅपिड अँड ब्लिट्झ टीम चॅम्पियनशिप स्पर्धेत पहिल्या क्रमांकाच्या होउ यिफानला हरवले. दिव्याच्या कामगिरीमुळे अखेर ती ज्या संघाची सदस्य होती त्या संघाने ब्लिट्झमध्ये कांस्यपदक आणि रॅपिड स्वरूपात रौप्यपदक मिळवले. तिच्या वैयक्तिक पदकांमध्ये सांघिक रौप्य (रॅपिड), सांघिक कांस्य (ब्लिट्झ) आणि वैयक्तिक कांस्यपदक यांचा समावेश आहे. दिव्याने पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळताना उल्लेखनीय कामगिरी केली.

# जयस्वालचे पहिले शतक : भारतदिवसअखेर ३ बाद २३०

**हेडिंग्ले, दि. २० :**

भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू झालेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताने दिवसअखेर ३ बाद २३० धावा केल्या. यशस्वी जयस्वालने दमदार शतक झळकावत आपल्या इंग्लंडमधील पदार्पणात जबरदस्त प्रभाव टाकला.

दुपारच्या सत्रात जयस्वाल आणि शुभमन गिल यांच्यात १०० धावांची भागीदारी झाली. चहापानापर्यंत भारताची धावसंख्या २१५/२ इतकी झाली होती. मात्र शेवटच्या सत्रात इंग्लंडच्या कर्णधार बेन स्टोक्सने शतकवीर जयस्वालला बाद करत भारताला तिसरा धक्का दिला. दिवसअखेर गिल ५८ धावांवर नाबाद असून, ऋषभ पंत त्याला साथ देत आहे.

त्याआधी सकाळच्या सत्रात केएल राहुल (४२) आणि जयस्वालने ९१ धावांची धडाकेबाज सलामी दिली. मात्र, लंचपूर्व सत्राच्या शेवटच्या काही मिनिटांत इंग्लंडने झटपट दोन विकेट्स घेत भारताचा झपाटा रोखला. पदार्पणवीर साई सुधरसन अवघ्या चार चेंडूत शून्यावर बाद झाला.

केएल राहुलने ख्रिस वोक्सच्या चेंडूंना सुंदर कव्हर ड्राइव्हस मारत सुरुवात केली. जयस्वालने काही आकर्षक चौकार लगावत फलंदाजीला गती दिली. १५व्या षटकात सलामी भागीदारीने ५० धावांचा टप्पा गाठला. लंचपूर्व शेवटच्या अर्ध्या तासात दोघांनी धावा झपाट्याने केल्या, पण राहुल बाद झाला आणि लगेचच सुधरसनही माघारी परतला.

दुपारच्या सत्रात गिल आणि जयस्वाल यांनी भारताचा डाव सावरला. जयस्वालने इंग्लंडमधील आपल्या पहिल्याच डावात अर्धशतक झळकावत पुढे दमदार शतकाची



नोंद केली. गिलनेही फक्त ५६ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करत उत्तम साथ दिली.करुण नायर आठ वर्षांनंतर कसोटी संघात पुनरागमन करत आहे, तर बी साई सुधरसनला हेडिंग्लेतील या सामन्यात चेतेश्वर पुजाराकडून कसोटी कॅप मिळाली.

शुभमन गिलला भारतीय कसोटी संघाचे नेतृत्व देण्यात आले असून, ही निवड नव्या युगाची सुरुवात मानली जात आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या अनुपस्थितीत ही मालिका भारतासाठी निर्णायक ठरणार आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीप्रमुख अजित आगरकर यांनी उचललेल्या धाडसी पावलांमुळे ही मालिका भारतीय संघबांधणीच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

हेडिंग्लेची खेळपट्टी कोरडी असून, पहिल्या सत्रात काही हालचाली होण्याची शक्यता आहे. जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजच्या आग्रही गोलंदाजीला या खेळपट्टीवर संधी असेल. बुमराह मालिकेतील केवळ तीन कसोटींमध्ये खेळणार असल्याचे संकेत आहेत.

**पहिली कसोटी पहिला दिवस**

- **यशस्वी जयस्वालचे इंग्लंडमधील पहिले कसोटी शतक.**
- **शुभमन गिलचे कसोटी कर्णधार म्हणून पदार्पण.**
- **करुण नायरचे संघात पुनरागमन.**
- **साई सुधरसनचे पदार्पण.**
- **इंग्लंडने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजी दिली.**

# क्लब वर्ल्ड कपमध्ये मेस्सीचा जलवा

**अटलांटा, दि. २० :**

लिओनेल मेस्सीच्या अप्रतिम फ्री-किक गोलच्या जोरावर इंटर मियामीने क्लब वर्ल्ड कपमध्ये गुरुवारी पोर्तोविरुद्ध २-१ असा नाट्यमय आणि आश्चर्यजनक विजय मिळवत स्पर्धेतील आपली मोर्चेबांधणी बळकट केली.

दुसऱ्या सत्रात मेस्सीने केलेल्या ट्रेडमार्क फ्री-किक गोलमुळे इंटर मियामीला निर्णायक आघाडी मिळाली. हा विजय मिळवत एमएलएस संघाने ग्रुप ए मधून पुढे जाण्याच्या आशा कायम ठेवल्या आहेत. याआधी ब्राझीलच्या पाल्मेरासने अल-अहलीवर २-० असा विजय मिळवला होता. परिणामी, इंटर मियामी आणि पाल्मेरासकडे प्रत्येकी ४ गुण झाले असून पोर्तो संघाला एकच गुण मिळालेला आहे.

सामन्याच्या सुरुवातीस पोर्तोने वर्चस्व राखले. आठव्या मिनिटाला समू अघेहोवाच्या पेनल्टी गोलमुळे त्यांना आघाडी मिळाली होती. ही पेनल्टी मियामीच्या नोहा ॲलनने बॉक्समध्ये जोआओ मारियोशी संपर्क केल्याच्या व्हीएआर पुनरावलोकनानंतर देण्यात आली.

पहिल्या सत्रात पोर्तोने अनेक संधी निर्माण केल्या, मात्र मियामीच्या रक्षणाने त्यांना दुसरा गोल करण्याची संधी दिली नाही. इंटर मियामीकडून लुईस सुआरेझ आणि बेंजामिन क्रेमास्ची यांनीही संधी मिळवून गोल



करण्याचे प्रयत्न केले, मात्र पोर्तोचा गोलकीपर क्लॉडिओ रामोस याने उत्कृष्ट बचाव केला.

दुसऱ्या सत्रात मात्र मियामीने सामना आपल्या बाजूने वळवला. ५१व्या मिनिटाला टेलास्को सेगोव्हियाने मार्सेलो वेइगँड्टच्या कट-बॅकवर जोरदार फटका मारत बरोबरी साधली. तीन मिनिटांनंतर, ५४व्या मिनिटाला मेस्सीला बॉक्सबाहेर फाउल मिळाल्यानंतर त्याने उजव्या टॉप कॉर्नरमध्ये फ्री-किक मारत मियामीसाठी निर्णायक आघाडी घेतली.

३७ वर्षीय अर्जेंटिनाच्या खेळाडूने पुन्हा एकदा सिद्ध केले की का तो अद्यापही जागतिक फुटबॉलचा चेहरा आहे. त्याचा खेळ सामन्यातील मुख्य आकर्षण ठरला. मर्सिडीज-बेंझ स्टेडियममध्ये सुरुवातीस रिकाम्या जागा दिसत असल्या तरी मेस्सीची झलक पाहण्यासाठी हळूहळू प्रेक्षकांची गर्दी वाढली आणि अखेर ३२,००० प्रेक्षक उपस्थित होते.

सामन्याच्या अखेरच्या क्षणांमध्ये पोर्तोने जोरदार दडपण आणले. सात मिनिटांचा इजुरी टाइमही घोषित करण्यात आला. मात्र, मास्चेरानोच्या मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या मियामीच्या खेळाडूंनी बचावात कसून प्रयत्न करत आपली आघाडी टिकवून ठेवली.

२०१८ मध्ये स्थापन झालेल्या आणि माजी इंग्लंड आंतरराष्ट्रीय डेव्हिड बेकहॅम यांच्या सह-मालकीच्या इंटर मियामीने २०२० मध्ये एमएलएसमध्ये पदार्पण केले होते. मेस्सीच्या २०२३ मधील आगमनामुळे संघाचे जागतिक प्रोफाइल लक्षणीयरीत्या वाढले आहे.

हा विजय एमएलएस संघासाठी युरोपीय संघाविरुद्ध क्लब वर्ल्ड कपमधील पहिला अधिकृत विजय आहे. चेल्सीने याआधी लॉस एंजेलिस एफसीला हरवले होते, त्या पार्श्वभूमीवर मियामीचा विजय अधिक महत्त्वाचा ठरतो.

# लिव्हरपूलने मिलोस केर्केझसाठी मोजले ४० दशलक्ष पौंड

**लिव्हरपूल, दि. २० :**

प्रीमियर लीगमधील मातब्बर क्लब लिव्हरपूलने बॉर्नमाउथचा प्रतिभावान डावखुरा डिफेंडर मिलोस केर्केझला ४० दशलक्ष पौंड देऊन करारबद्ध केले आहे. २१ वर्षीय हंगेरीचा हा आंतरराष्ट्रीय खेळाडू दोन हंगामांच्या यशस्वी कारकिर्दीनंतर रेड्स'मध्ये सामील होण्यासाठी सज्ज आहे.

बॉर्नमाउथने केर्केझच्या जागी आधीच रेनेसच्या ॲड्रियन ट्रफर्टला करारबद्ध केले आहे. केर्केझच्या कराराची अधिकृत घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. हा करार लिव्हरपूलकडून बायर लेव्हरकुसेनच्या फ्लोरियन विर्ट्झसाठी नियोजित असलेल्या क्लब-विक्रमी ११६ दशलक्ष पौंड हस्तांतरणाच्या पार्श्वभूमीवर झाला आहे. याचबरोबर, लिव्हरपूलने डच राईट-बॅक जेरेमी फ्रिमपोंगलाही २९.५ दशलक्ष पौंड मोजून करारबद्ध केले आहे.

सर्बियामध्ये जन्मलेला केर्केझ आपल्या वरिष्ठ कारकिर्दीची सुरुवात हंगेरीतील ग्योर संघातून झाली. नंतर तो इटालियन क्लब एसी मिलानमध्ये गेला, मात्र तिथे वरिष्ठ संघासाठी खेळण्याची संधी मिळाली नाही. जानेवारी २०२२ मध्ये तो डच क्लब एझेड अल्कमारमध्ये सामील झाला आणि २०२२-२३ हंगामात क्लबला डच लीगमध्ये चौथे स्थान मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. युरोपा कॉन्फरन्स लीगच्या उपांत्य फेरीपर्यंत पोहोचलेल्या त्या संघात केर्केझने ५२ सामने खेळत पाच गोल



आणि सात असिस्टची नोंद केली.

२०२३ मध्ये लिव्हरपूलचे सध्याचे क्रीडा संचालक रिचर्ड ह्यूजेस बॉर्नमाउथसाठी कार्यरत असताना, त्यांनी केर्केझला प्रीमियर लीगमध्ये आणले होते. गेल्या हंगामात केर्केझने बॉर्नमाउथमधून सर्व ३८ लीग सामने खेळत दोन गोल व सहा असिस्ट करत शानदार प्रदर्शन केले. त्याच्या खेळामुळे बॉर्नमाउथने क्लब इतिहासातील सर्वोत्तम ५६ गुणांची कमाई करत नववे स्थान पटकावले.

हंगेरीसाठी २३ सामने खेळलेल्या केर्केझसाठी लिव्हरपूलमध्ये देशबांधव डोमिनिक स्झोबोस्झलाईसोबत पुन्हा एकत्र खेळण्याची संधी असेल. ॲनफिल्डवर त्याच्या आगमनामुळे डाव्या बाजूच्या डिफेन्समध्ये स्पर्धा वाढणार आहे. अँडी रॉबर्टसनचे ॲटलेटिको माद्रिदशी नाव जोडले जात असतानाच, कोस्टास त्सिमिकासच्या भविष्यावरही अनिश्चितता आहे. क्लब रॉबर्टसनला संघात कायम ठेवण्यास इच्छुक असला, तरी नियमित खेळाच्या शोधात ३१ वर्षीय स्कॉटलंडचा डावखुरा डिफेंडर क्लब सोडण्याचा निर्णय घेऊ शकतो.

लिव्हरपूलच्या आघाडीच्या फुटबॉल तत्त्वज्ञानात, आक्रमक पद्धतीने चेंडू जिंकणे आणि हाय-प्रेसिंग शैली अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या शैलीत केर्केझचा प्रभावी सहभाग अपेक्षित आहे.

गेल्या हंगामात केर्केझने १६९ वेळा चेंडू पुन्हा मिळवला . प्रीमियर लीगमधील पाचवा सर्वोच्च आणि लिव्हरपूलमधील कोणत्याही डिफेंडरपेक्षा जास्त. आक्रमक तिसऱ्या भागात त्याने ११ वेळा चेंडू मिळवत विभागातील नववा सर्वोच्च क्रमांक मिळवला. तसेच, त्याच्या ३४ ओपन प्ले' संधी निर्मितीपैकी पाच असिस्टसह तो चौथ्या क्रमांकावर होता.

त्याचे १४२ क्रॉस हे डिव्हिजनमधील सहाव्या क्रमांकाचे सर्वाधिक होते. त्याने निर्माण केलेल्या आठ 'बिग चान्सेस' त्याला डिफेंडरपैकी सातव्या स्थानी ठेवतात. केर्केझने २२ यशस्वी ड्रिबल्ससह अंतिम तिसऱ्या भागात ४७६ वेळा चेंडू पोहोचवला . हे दोन्ही आकडे लिव्हरपूलच्या सध्याच्या बचावपटूंहून सरस आहेत.

नवीन व्यवस्थापक आर्ने स्लॉटच्या अधिक संरचित पण आक्रमक शैलीतही केर्केझ उत्तम प्रकारे जुळून येऊ शकतो. जरी क्लॉपच्या हाई इंटेन्सिटी' खेळाशी तुलना होऊ शकत नसली, तरी प्रेशर तयार करून चेंडू मिळवण्याच्या मूळ संकल्पना अजूनही क्लबमध्ये कायम आहेत.

केर्केझचा बहुआयामी बचाव आणि आक्रमणातला सक्रीय सहभाग, त्याचे वय आणि उर्जा यामुळे तो लिव्हरपूलच्या पुनर्बांधणीच्या योजनेत महत्त्वाचा घटक ठरण्याची शक्यता आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २८९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 289 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .